| | | | |
|---|---|---|---|
| ३१ | नाशिक शहरातील मॅनेजमेन्टच्या विद्यार्थ्यांच्या दृष्टिकोनातून महात्मा गांधींच्या शिक्षणाबद्दलच्या विचारांची कालानुरूपता | डॉ. स्मिता कचोळे | १६३.१७२ |
| ३२ | महात्मा गांधी की आदर्श ग्राम संकल्पना | प्रा. प्रकाश विठ्ठल सोनवणे | १७३.१७६ |
| ३३ | महात्मा गांधीच्या विश्वस्त संकल्पनेचे विश्लेषण | डॉ. ग्यानदेव उपाडे | १७७.१८२ |
| ३४ | महात्मा गांधी यांची मोक्ष संकल्पना | डॉ. मुबीन शेख | १८३.१८५ |
| ३५ | गांधी तत्वज्ञानातील स्त्री स्वातंत्र्य: एक तात्विक अभ्यास | प्रा. मनोज उत्तमराव पाटील | १८६.१८९ |
| ३६ | पर्यावरणीय नीतिशास्त्र आणि गांधीवादी दृष्टीकोण | प्रा. अनघा पाध्ये–देशमुख | १९०.१९६ |
| ३७ | गांधी ते महात्मा गांधी : गांधीच्या जडणघडणीत ग्रंथाचा प्रभाव | प्रा. डॉ. शीला गोडबोले – पाईकराव | १९८.२०३ |
| ३८ | गांधीजी का ग्राम स्वराज चिन्तन वर्तमान परिप्रेक्ष्य में..... | प्रो. डॉ. लोकेश जैन | २०४.२१८ |
| ३९ | महात्मा गांधींवरील पाश्चात्य विचारवंतांचा प्रभाव: लिओ टॉलस्टॉय, जॉन रस्किन आणि हेन्री डेविड थोरो | डॉ. तानाजी पोळ | २१९.२२३ |
| ४० | हिन्दी नाट्य–साहित्य में अभिव्यक्त गांधीवाद | प्रा. डॉ. प्रकाश कृष्णदेव धुमाल | २२४.२३२ |
| ४१ | गांधीवाद का हिन्दी पद्य (कविता) पर प्रभाव | प्रा. डॉ. सुनिलदत्त एस. गवरे | २३३.२३९ |
| ४२ | गांधी विचारांची विश्वात्मकता | श्री. जयवंत प्रभाकर बोधले | २४०.२४३ |
| ४३ | स्वदेशी : अहिंसक जीवनदृष्टी | प्रा. शितल रुद्रमुनी येरुळे | २४४.२४७ |
| ४४ | महात्मा गाँधी – एक युग पुरुष | प्रो. अंजना विजन | २४८.२५२ |


PRINCIPAL
Sonopant Dandekar Arts College
V. S. Apte Commerce College &
M. H. Mehta Science College
Palghar (W.R.)
Dist. Palghar. Pin 401 404

Akshar Wangmay(International Research Journal)
UGC CARE Journal
ISSN: 2229-4929 RNI MAHMAR 36829-2010
National Conference on Rethinking Mahatma Gandhi in Present Context
Organized by: Sonopant Dandekar Arts, V. S. Apte Commerce & M. H. Mehta Science College Palghar, Maharashtra, India
Held on 29th February 2020

# गांधी ते महात्मा गांधी : गांधीच्या जडणघडणीत ग्रंथाचा प्रभाव

**प्रा. डॉ. शीला गोडबोले–पाईकराव**
ग्रंथपाल
सोनोपंत दांडेकर महाविद्यालय,
पालघर

## प्रस्तावना :

भारताच्या आधुनिक इतिहात / भारतीय समाजजीवनावर ज्या अलौकीक महान पुरूषांचा चिरंतन प्रभाव दिसून येतो त्यामध्ये गांधीजींचे नाव अग्रक्रमाने घ्यावे लागते. गांधीजींच्या प्रभाव केवळ भारतीय जनमाणसावरच झाला आहे असे नसून जागतिक समुदाय देखील त्यांच्या अचार, विचार व कर्तृत्त्वाने प्रभावित झाला आहे. त्यांची महानता केवळ त्यांच्या अलौकीक विचारधनाने नव्हे तर त्यांचे सद्वर्तन हे जागतिक समुदायासाठी सातत्यशील प्रेरणास्त्रोत ठरला आहे. माहिती तंत्रज्ञानात झालेल्या प्रचंड क्रांतीमुळे व माहितीचा स्फोट झाल्यामुळे साहजिकच जग जवळ आले आहे. अनेक धर्म समुदाय जवळ येत आहेत. मात्र तरीही जागतिक शांतता, सहिष्णूता, व अहिंसा, बंधुभाव यालाच आव्हान निर्माण झाले आहे. त्यामुळे गांधीजींची गरज जशी हयात असतांना होती तेव्हढीच किंबहुना त्यापेक्षा जास्त गरज आज निर्माण झाली आहे. जेव्हा जेव्हा जग व समाजात असहिष्णूता, अशांती, अराजकता, अमानवीयता असणार आहे त्या त्या वेळी गांधीच्या विचारांची व आचारांची प्रासंगिकता सिद्ध होणार आहे.

गांधी एक केवळ व्यक्ती नसून तो सर्वव्यापी, सर्वसमावेशी, सर्वप्रासंगी, सर्वहितेशी असा विचार आहे. गांधींच्या जन्मापासून ते अगदी निर्वाणापर्यत त्यांच्या घडण्याची प्रक्रिया जशी सुरू होती त्यासोबतच त्यांच्या जाणिवा प्रगल्भ होण्याच्या नंतरच्या काळापासुन ते महात्मा होण्यापर्यतचे गांधी एका क्षणत ,दिवसात ,काहीएक वर्षात घडलेले नाहीत. त्याचां महात्मा होण्यापर्यतच्या काळ हा जसा त्यांच्या ग्रहणकाळ होता तसेच तो काळ इतरानां देण्याचाही काळ होता.महात्मा, महामानव, महापुरुष, मानवश्रेष्ठ, पुरुषोत्तमासाठीच्या ज्या गुणग्राकतेची, धारणेची गरज ज्याकडे असते सामान्यपणे समाज त्या व्यक्ती महात्म्याला त्याच दृष्टीने बघत असतो. गांधी साधारण मनुष्याप्रमाणेच असेल तरी त्याच्यां व्यक्तीमत्वात त्यांच्याकडे असलेली आदर्श गुणवैशिष्ट्ये असाधारण व अमुल्यच होती. त्यांच्याकडे एक विशिष्ट धार्मिक, नैतिक व अतुच्य मानवीय शक्ती होती. त्यामुळे त्यांचे वेगळेपण जगाच्या दृष्टिला पडले.

PRINCIPAL
Sonopant Dandekar Arts College
V. S. Apte Commerce College &
M. H. Mehta Science College
Palghar (W.R.)
Dist. Palghar Pin 401 404

Akshar Wangmay(International Research Journal)
UGC CARE Journal
ISSN: 2229-4929 RNI MAHMAR 36829-2010
National Conference on Rethinking Mahatma Gandhi in Present Context
Organized by: Sonopant Dandekar Arts, V. S. Apte Commerce & M. H. Mehta Science College Palghar, Maharashtra, India
Held on 29th February 2020

राजकीय व सामाजिक पटलावरील गांधींचा जागतिक उदय साऱ्या जगाला दिपवून टाकणारा आहे. सर्वभेद मुक्त मानवसमाज व आदर्श मानवी आचरण घडवून जागतिक बंधुभाव, अहिंसा, प्रेम, शांती, निर्माण करणे हे माझे महत्त्वाचे काम आहे असे त्यांनी बोलून दाखविले आहे. एखाद्या देशाने, व्यक्तिने, समाजाने दुसऱ्या व्यक्तिला, देशाला, समाजाला गुलामीत ठेवणे, पारतंत्र्यां ठेवणे हाच मुळात मानवता द्रोह आहे. तो सत्याच्या विरूद्ध द्रोह आहे अशी त्यांची धारणा आहे.

भारतीय समाजातील स्त्री – पुरूष भेद, रंगभेद, जाती, वर्ण, प्रांत व धर्मभेद, अस्पृश्यता, हुंडाप्रथा, आर्थिक व सामाजिक विषमता नष्ट करून एक आदर्श समाजव्यवस्था निर्माण करणे, ग्रामिण भारत स्वयंपूर्ण करून सर्वोदयाच्या द्वारे समाजाच्या अतिदं व्यक्तीचा सर्वागिण विकास घडवून आणने हेच गांधींच्या विचार व कृतीचे मर्म होते व त्यासाठी त्यांनी जे जे करावयाचे होते ते केले. बलाढ्य सत्तेशी लढून त्यांनी स्वातंत्र्य मिळविणे ही बाब जशी महनीय व अतुलनीय आहे तशीच भारतीय समाजातील विषमता व अनेक समस्या विरूद्ध सामाजिक स्थित्यंतर घडविणे खूप धाडसाचे होते.

गांधीच्या विचार व कृतीने भारतीय समाजात खूप आमुलाग्र बदल घडून आले. आजही ती प्रक्रिया चालूच आहे. पण त्याला आधार त्याचा पाया हा गांधी विचार व गांधी प्रेरणा आहे.
ब्रिटीशांना नमविणारे गांधी, जगातील अनेक महान व्यक्तिमत्त्वांना भुरळ घालणारे गांधी, अनेक कुरकर्म्यांना झुकविणारे गांधी, भारतातील कर्मठ, धर्मप्रिय, कट्टर सनातनी पुराणवाद्यांना चार पावले मागे टाकायला लावणारे गांधी ही मानवी समाजासाठी एक अद्भूत घटना आहे.

गांधींचा आफ्रिकेतील राजकीय व सामाजिक क्षेत्रातील प्रवेश ही घटना त्यांच्या महात्मा बनण्याच्या प्रक्रियेचा एक महत्त्वाचा टप्पा आहे. आफ्रिकेतील भारतीय समुदाय, तसेच वर्णद्वेषाला बळी पडणाऱ्या लोकांचे दु:ख जाणून घेऊन व वर्णद्वेषाची स्वत: अनुभुती आल्यानंतर त्याच्या व्यक्तिमत्त्वात झालेले बदल या सर्व घटना सहज वाटत असल्या तरी समाज अन्यायाविद्ध संघटित करून त्या समाजाला दिशा देऊन एका यशस्वी वळणावर नेऊन ठेवणे ही अत्यंत महत्त्वाची बाब आहे.

भारतावर असणारी १५० वर्षाची ब्रिटिश सत्ता भारतीय समाजात पाच हजार वर्षापासूनच्या भेदमुलक रूढी नष्ट करण्याचे अत्यंत क्रांतीकारी कार्य गांधीजींनी सत्य, अहिंसा, व निती या तत्त्वांच्या आधारे सत्याग्रह, उपवास, हरताळ, असहकार या मार्गाने यशस्वी करून दाखविले.

१८५७ च्या राष्ट्रिय उठावातही समग्र भारत ब्रिटिशांच्या विरोधात गेला असतांनाही भारतीय जनता ब्रिटिशांना हरवू शकली नाही कारण नेतृत्त्वाचा अभाव – सर्वव्यापी कुशल, सर्वमान्य नेतृत्त्वाचा अभाव. गांधीचे नेतृत्त्व हे सर्वमान्य होते. त्यामूळे गांधीच्या चळवळी यशस्वी होत गेल्या. त्यामागे केवळ

Akshar Wangmay(International Research Journal)
UGC CARE Journal
ISSN: 2229-4929 RNI MAHMAR 36829-2010
National Conference on Rethinking Mahatma Gandhi in Present Context
Organized by: Sonopant Dandekar Arts, V. S. Apte Commerce & M. H. Mehta Science College Palghar, Maharashtra, India
Held on 29th February 2020

गांधीचे विचार होते असे नव्हे तर त्यांचे वैयक्तिक आचरण हा अत्यंत महत्त्वाचा घटक होता. आचार व विचार व कृतीले परिपूर्ण महात्मा गांधी कशामुळे घडले? त्या घडण्याच्या स्थित्यंतराच्या मार्गावर अनेक घटक कारणीभूत असले तरी अत्यंत महत्त्वाचा घटक म्हणजे 'ग्रंथ'. त्यांच्या जीवनावर, त्यांच्या घडत जाण्यावर, त्यांच्या विचार आचार व सार्वजनिक व्यवहारांवर ग्रंथांचा प्रचंड प्रभाव दिसून येतो.

बाल्यावस्थेत ग्रंथ वाचनाच्या रूपाने त्यांच्या आईवडीलांच्या रामायण, महाभारतातील गोष्टीरूपाने काही तात्त्विक सत्ये त्यांच्या कानी पडल्यामुळे मुळात ते धार्मिक स्वभावाचे होते, पण शैक्षणिक जीवनात त्यांनी रामायण, महाभारत, गीता हे सर्व प्राचीन ग्रंथ वाचुन काढले. केवळ वाचण्याच्या वृत्तीने नव्हे तर त्यातील आशय समजुन सत्य, अहिंसा व प्रेम याच्याशी काही मिळते जुळते आहे का? या दृष्टिने.

तुलसीदासलिखित रामायण बाबत ते म्हणतात, या ग्रंथातील प्रत्येक आशय व भावना मला मंत्रमुग्ध करतात.

'महाभारत' मधील 'कृष्ण' हे असंख्य भारतीयांसाठी जीवन प्रेरक आहेत. म्हणून महाभारत हा ग्रंथ हा ऐतिहासिक आहेच पण हा ग्रंथ गहन आहे. या ग्रंथाच्या माध्यमातून मानवी मन व जीवन व कृती व्यवहार यांचे द्वंद्व वारंवार अनुभवयास मिळते अशी त्यांची भावना आहे. त्यातील पानांच्या व्यवहारामुळे अत्यंत सजीव वाटते ते आजतागायत शेकडो हजारो वर्षापासून.

गीता वाचनानेही त्यांच्या विचार व कृतीत प्रचंड बदल झाला. गीतेतील तत्त्वांचा त्यांच्यावर प्रचंड प्रभाव पडला. एखाद्या ग्रंथातील शब्दापेक्षा त्या शब्दाचा अर्थ व त्यामागील भावनेला मी आधिक महत्त्व देतो असं त्यांनी म्हटलयं.

जगातील जवळपास इस्लाम, बौद्ध, जैन, ख्रिश्चन, हिंदू या धर्माची धर्मग्रंथ त्यांनी वाचली आहेत. त्यांनंतर ते या निष्कर्षाला आले की सर्व धर्माचे सार आहे. 'मानवता' – 'एकता'.

'आपणच आपले सर्वात मोठे शत्रू आहोत दुसरे कोणी नाही' – हे तत्त्व अनेक धर्मांनी मांडले आहे. या तत्त्वांचा संबंध प्रत्येक व्यक्तीच्या वैयक्तिक विचार व आचरणाशी आहे. व प्रत्येक व्यक्तीचे विचार व व्यवहार हा समाज व समाजाशी निगडीत आहे. त्यामूळे स्वानुभुती खुप महत्त्वाची आहे. गीतेत तेच सांगितले आहे.

गांधींच्या जीवनावर बुद्ध, सॉक्रेटीस, मोहम्मद पैगंबर यांच्याही तत्त्वज्ञानाचा प्रभाव होता. त्यांचे राजकीय गुरू गोपाळ कृष्ण गोखले यांच्या व गांधीच्या जीवनावर टॉलस्टॉय यांच्या, "The kingdom of god within you" या ग्रंथांचा प्रचंड प्रभाव पडला. टॉलस्टॉयने अत्यंत महत्त्वाची तत्त्व प्रतिपादीत केली जी गांधींना त्यांच्या जीवनात अत्यंत मोलाची वाटली ती म्हणजे, स्वतंत्र विचारसरणी, स्वतंत्रपणे

Akshar Wangmay(International Research Journal)
UGC CARE Journal
ISSN: 2229-4929 RNI MAHMAR 36829-2010
National Conference on Rethinking Mahatma Gandhi in Present Context
Organized by: Sonopant Dandekar Arts, V. S. Apte Commerce & M. H. Mehta Science College Palghar, Maharashtra, India
Held on 29th February 2020

निर्भयपणे, विवेकी विचार करणे, पराकोटीची नैतिकता, व सत्य हेच अंतिम सत्य. ही सर्व तत्वे गांधीनी पदोपदी आपल्या व्यवहारात प्रत्यक्षात उतरविली आहेत. त्यांच्या नेतृत्त्वाखालील चळवळीत व त्यांच्या दैनंदिन आचरणात या सवू नितीमुल्यांचे दर्शन तत्कालिन भारतीय समाजाने घेतले आहे.

ठंग्रजी विचारवंत असणारे जॉन रस्किन यांचे "Unto this Last"हे पुस्तक तर गांधी यांच्या जडणघणीत अत्यंत महत्त्वाचे साधन ठरले आहे., या ग्रंथाचा सखोल परिणाम त्यांच्या अधिकाधिक सखोल विचारसरणी वैचारीक व व्यावहारीक भुमिकेवर झाला आहे, हे पुस्तक त्यांच्यासाठी जादूचा मंत्र (Magic Spell) ठरले. इतके त्यांचे गांधीच्या जीवनात महत्त्व आहे. गांधीचे मित्र पोलॅक (Polak)यांनी त्यांना हे पुस्तक दिले जोहान्सबर्ग ते डर्बन या प्रवासात त्यांनी वाचुन काढले पुढे याच पुस्तकाचे भाषांतर गांधीजींनी गुजराती भाषेत, सर्वोदय या नावाने (The welfare of All) केले. "Unto this Last"या ग्रंथाने गांधीच्या प्रत्यक्षवृती व व्यवहारात ही तत्त्वे कायमची रूजली गेली. आत्मसात केले गेली.

रस्किनने मानवी जीवनासाठी आवश्यक असणारी आदर्श जीवनमुल्ये वर्णिली, गांधीजींना ती खूपच नीतीदर्शक, मार्गदर्शक वाटतात.

१. सर्वाच्या कल्याणातच स्वत:चे सुख असले पाहीजे / पाहीले पाहीजे.
२. प्रत्येकाला स्व विचार व मार्गाने जीवन जगण्याचा अधिकार आहे.
३. प्रत्येकाच्या जीवनाला किंमत असते व महत्त्व दिलेच पाहीजे.

गांधी या तत्त्वांमुळे प्रचंड प्रभावित झाले व या मार्गदर्शक तत्त्वांचा वापर त्यांनी स्व आचरणात आणून प्रत्येक प्रार्थनेवेळी ते ही तत्त्वे विविध रूपाने उद्युक्त करीत असत.

गीता भारतीय समाजासाठी पथदर्शक आहे. गांधीचा गीता वाचनाचा अनुभव मात्र इंग्लंड मधील. गीतेच्या वाचनानंतर ते या निष्कर्षाला आले ही सत्याचा शोध घेण्याचे अत्यंत प्रभावी व परिपूर्ण माध्यम गीताच ठरू शकेल. आयुष्यभर गीतेची शिकवण ही प्रमाण मानुन त्यांनी पुढील कार्याची दिशा ठरवली. त्याग. निस्वार्थ वृत्ती व समर्पित कर्तव्य ही नितीतत्त्वे गीतेतून त्यांनी आपल्या जीवनात उतरविली आहेत.

गांधीजींनी धडाडीच्या राजकीय व सामाजिक जीवनात व्यस्त असूनही वाचनाचा व्यासंग सतत चालू ठेवला. सर्व धर्माची मुलभूत तत्त्वे जाणून घेण्यासाठी त्यांनी अनेक धर्मग्रंथ अभ्यासले, बायबल वाचले The New Testamentतसेच The Sermon on The Mountया ग्रंथानी त्यांना खूपच प्रभावित

Akshar Wangmay(International Research Journal)
UGC CARE Journal
ISSN: 2229-4929 RNI MAHMAR 36829-2010
National Conference on Rethinking Mahatma Gandhi in Present Context
Organized by: Sonopant Dandekar Arts, V. S. Apte Commerce & M. H. Mehta Science College Palghar, Maharashtra, India
Held on 29th February 2020

केले The Sermon onThe Mountहे पुस्तक तर त्यांच्या हृदयाला हात घालणारे ठरले. येशुची करूणा, दयाभाव त्यांना या ग्रंथाच्या माध्यमातून कळला.

## निष्कर्ष :

गांधी ते महात्मा गांधी घडण्याच्या प्रक्रियेमध्ये अनेक घटकांचा त्यांच्यावर प्रत्यक्ष अप्रत्यक्ष प्रभाव पडला आहे. महात्मा रूपाने जगासमोर आलेले गांधी घडण्यात ग्रंथाची भूमिका खूप महत्त्वाची आहे.

रामायण, महाभारत, गीता, बायबल, कुराण, "Unto this Last, The New Testament, The Semon on The Mount, The Kingdom of God within you या ग्रंथांचा परिणाम गांधी घडण्यावर झाला आहे. त्यामुळेच या ग्रंथातील नितीजत्त्वे त्यांच्या वैयक्तिक आचार विचार कृती व व्यवहारातून सत्य, अहिंसा, प्रेम, धर्मनिरपेक्षता, सत्याग्रह, सहकार्य, बंधुभाव, जागतिक शांतता, मानवी अधिकार, समानता, निर्भयता, न्याय या रूपाने भारतीय समाज अनुभवतो आहे.

## संदर्भ :

१. महात्मा गांधी विचार विथिका ले. सुरेंद्र प्रसाद अग्रवाल concept publishing company ISBN 81-7022872-7 (2011)
२. लोकसेवक प्रा. अमर जावळे / प्रा. भूषण काटे प्रशांत प्रकाशन
३. Law.multimedia.in
४. गांधीजींची ओळख पन्नालाल सुराणा सुगावा प्रकाशन जून – २००४
५. We The People – Nani Palkhiwale अनुवाद वि. स. खांडेकर